# वार्तापत्र

कार्यालय पोलीस अधीक्षक,
गडचिरोली दि. १९/०१/२०१८

राज्यातील प्राविण्यप्राप्त खेळाडुंना शासकिय, निमशासकिय व इतर क्षेत्रात नौकरीसाठी ५ टक्के आरक्षण देण्यासंदर्भात शासनाने शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग क्रमांक राक्रिधो-२००२/प्र.क्र.६८/क्रियुसे-२, दिनांक ०१/०७/२०१६ अन्वये, सर्वसमावेशक सुचना निर्गमित केलेल्या आहेत.

वरिल शासन निर्णयातील नियम ४ (पाच) नुसार खेळाडु उमेदवारांने अर्ज करण्यापुर्वीच सुधारित तरतुदीनुसार विभागीय उपसंचालक यांचेकडून खेळाच्या प्रमाणपत्राची पडताळणी करुन घेणे आवश्यक आहे. त्यामुळे खेळाडु उमेदवारांने अर्जासोबत विभागीय उपसंचालक यांनी क्रिडा प्रमाणपत्र योग्य असल्याबाबत खेळाडु कोणत्या संवर्गासाठी पात्र ठरतो याबाबत प्रमाणीत केलेले प्रमाणपत्र जोडणे आवश्यक राहील. वरिल प्रमाणे पडताळणी केलेल्या क्रिडा प्रमाणपत्राची प्रत अर्जासोबत जोडली नसल्यास, सदरहु शासन निर्णयातील नियम ६ (आठ)(नउ) नुसार सदरहु उमेदवारांचा खेळाडु संवर्गातुन विचार करता येत नाही.

सन-२०१८ ची पोलीस शिपाई भरती प्रक्रियेसाठी जाहिरात दिनांक ०५/०२/२०१८ रोजी प्रसिध्द होण्याची शक्यता आहे. तरी खेळाडु उमेदवारांनी त्यांच्या खेळाच्या प्रमाणपत्राची संबंधित विभागीय उपसंचालक यांच्याकडून पडताळणी करुन त्याबाबतचा अहवाल दिनांक ०५/०२/२०१८ पुर्वी प्राप्त करुन घ्यावा.

खेळाडु उमेदवारांनी त्यांच्या खेळाच्या प्रमाणपत्रांची संबंधित विभागीय उपसंचालक यांच्याकडून पडताळणी केल्या बाबतचा विहीत कालावधीतील प्रमाणपत्र आवेदन अर्जासोबत नसल्यास अर्जादाराचा खेळाडु संवर्गातुन विचार करण्यात येणार नाही.